# महसूल अधिकारी संघटनाः एक मनोगत!

आपल्या महसूल अधिकारी संघटनेचे राज्यस्तरीय अधिवेशन डिसेबर २०१२ मध्ये मा. मुख्यमंत्री, मा. उपमुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री,मा. महसूल राज्यमंत्री व सर्व सन्माननीय अतिथी, अधिकारी यांच्या उपस्थितीत यशस्वीपणे पार पाडले. त्याला एक वर्ष कालावधी पुर्ण झालेला आहे. यानंतर आपण संघटनेच्या संकेतस्थळाचे काम हाती घेऊन जून महिण्यात maharashtracivilservice.org हे आपले संकेतस्थळ मा. महसूल मंत्री, मा.अप्पर मुख्य सचिव यांच्या उपस्थितीत विमोचीत केले आहे. या संकेत स्थळास अपेक्षेपेक्षा खुपच अधिक प्रतिसाद मिळालेला असून भेट देणा–याची संख्या इतक्या कमी कालावधीत १ लाखाच्या वर पोहोचलेली आहे. या कालावधीत आपली संघटना तुलनात्मक अधिक कार्यरत दिसून येत आहे. या कालावधीत कधी नव्हे ते सर्व संबंधित संघटना सदस्य, पदाधिकारी, मंत्रालयीन अधिकारी/ कर्मचारी यांच्यापासून ते मा. अपर मुख्य सचिव (महसूल), मा. महसूल मंत्री ,मा. मुख्यमंत्री इथपर्यत एक सकारात्मक साखळी दिसून येते आहे. आपल्या संपर्क पुस्तकेसाठी (Profile book साठी) आपल्यापेक्षा मंत्रालयीन अधिकारीच अधिक पाठपुरावा करीत होते, यावरूनच हे लक्षात येते. या कालावधीत संघटनेने खूप काही मिळवले. हे अर्थातच सहजतेने मिळत नसते व मिळवले नाही, यासाठी प्रचंड अभ्यास, पाठपूरावा, संपर्क, मुद्दे पटवून देण्याची क्षमता, उत्साह, वेळ इ. असावा लागतो, तो पदाधिका–यांनी दर्शविलेला व सिध्द केलेला असल्यानेच हे यश मिळालेले आहे. याकामी मदत करणारे सर्व अधिकारी/सचिव ते सर्व सन्माननीय मंत्री महोदय यांचे आभार आपण मानलेले आहेतच. आपल्या विभागाविषयी अपार आस्था असणारे मा. अपर मुख्य सचिव, मा. महसूल राज्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.उपमुख्यमंत्री व मा. मुख्यमंत्री महोदय यांचे आभार मानलेले आहेत, पण ज्यांनी यातील कायदेशीर तरतूदीचा अभ्यास करून हा प्रस्ताव परिपुर्णपणे सर्वांना सादर करून त्याची आवश्यकता समजावून सांगितली व त्याच्या मंजूरीतील सर्व अडचणी दूर केल्या अशा आपल्या संघटनाच्या पदाधिका–यांचे कोणी आभार मानले नाहीत, त्यासाठी दोन शब्द लिहावेत या इच्छेतून हे मनोगत लिहित आहे. तसेच हे लिहिताना स्पष्ट करू इच्छितो की, मी संघटनेत कुणीही नाही पण संघटना आपणा सर्वासाठी काय करीत आहे, हे सजगतेने पाहणारा एक प्राथमिक सदस्य आहे आणि त्या मुख्य हेतूतूनच मी माझे विचार येथे मांडत आहे.

मला विदर्भ, मराठवाडा व मुंबई या तिन्ही ठिकाणावरून काम करीत असताना संघटना निश्चितच वेगवेगळी दिसलेली आहे. याला भौगोलिक अंतर कारणीभूत होतेच, तसेच संघटनाचे विषय हे मुलतः आस्थापना / लेखा विषयक बाबीशी संबंधित असल्याने ते समजण्यासाठी जी प्रशासकीय सज्ञानता (Maturity) हवी असते, ती मिळविण्यासाठी बराच काळ जावा लागतो (आता तरी हे विषय कोठे समजतात! असो) ते ही एक कारण असेल, तसेच वयाचा एक टप्पा असतो तेथे प्रत्येक गोष्टीकडे वेगळया दृष्टीकोनातून पाहाण्याची सवय असते, एकदम बदल हवा असतो, आपल्या विषयी अनेक अतीरंजीत समज गैरसमज असतात या समजामुळे आपण more equal among equals (!) आहोत,असे वाटते आणि म्हणून आपणास हवे ते विनासायास मिळावे असे वाटते. प्रशासकीय बदल evolutionary असतात revolutionary नाही, हे कळायलाही बराच वेळ जातो. या कालावधीत हे सर्व टप्पे मी विविध पदे / ठिकाणे या स्वरूपात पार केलेली

असल्यामुळे मला आपली संघटना सर्व स्वरूपात अनुभवता आली. आणि याच प्रवासात हे पण जाणवले कि संघटना विविध पध्दतीने आपणासाठी खूप काही करीत आहे.

आपली संघटना विधिवत स्वरूपात २००९ मध्ये आपण स्थापन केलेली असली तरी आपण त्यासाठी कोणताही निधी निर्माण केलेला नाही. पदाधिका–यांना एखादे निवेदन लिहिण्यासाठी लेखनिकापासून ते संबंधितापर्यंत पोहोचविण्यासाठी कोणत्याही प्रकारची सुविधा पुरविण्यात येत नाही. त्यामुळे मी पाहतो त्याप्रमाणे हे पदाधिकारी स्वत:च वेळ काढून पत्र/representation लिहितात, स्वत:च आपल्या पध्दतीने त्यास पोचते करतात. संघटनेस स्वंतत्र कार्यालय व कर्मचारी वर्ग नसल्याने हा सर्व पत्र व्यवहार करणे व तो सांभाळणे मानवी क्षमतेच्या बाहेरचे काम असते. सुरूवातीला मला ही वाटायचे, त्यात एवढे कोणते मोठे काम आहे, चार पत्र लिहायची व पाठवायची! पण प्रत्यक्षात पाहिल्यानंतर लक्षात येते की, अनेक अडचणीवर मात करून अभ्यासपुर्वक व परिणामकारक एक निवेदन लिहायचे असेल तर ७ दिवस जातात. आणि आपणास कल्पना नसावी एवढया मोठया प्रमाणावर अशा प्रकारची विविध निवेदन देण्याचे, त्याचा पाठपुरावा करण्याचे काम संघटने मार्फत करण्यात येत आहे. तसेच हे काम करीत असताना आपण आपल्या प्रशासकीय कामावर सुध्दा दुर्लक्ष करू शकत नाहीत. संघटनेवर नाराज असण्या–या प्रत्येकाचा अभ्यास केला तर एक गोष्ट निश्‍चितच अशी दिसून येते की, आपल्या बहुतांश समस्या तात्पुरत्या किंवा वैयक्तिक स्वरूपाच्याच असतात. अर्थात अपवादाने वेगळी परिस्थिती सुध्दा असू शकते. पण आपला दृष्टिकोन हे काम संघटनेने करायला हवे असा असणे हे संघटने विषयी अतिरेकी अपेक्षा ठेवणारे ठरते. तसेच या गोष्टीचाही विचार करावा लागेलच की संघटना म्हणजे शेवटी काय व कोण? तर आपण सर्वच! ती वेगळी असे कोणी नाही. त्यामुळे ज्या कोणाला एखादा issue/ विषय संघटना पातळीवरील योग्यतेचा वाटतो, त्याने तो चांगल्याप्रकारे तयार करणे व सर्वाच्या सहकार्याने पाठपुराव्याने मान्य करून घेणे, म्हणजेच संघटनेचे यश! येथिल काही तळमळीने काम करणारे अधिकारी पाहिले, त्यांची स्वत:च एखादा विषय घेऊन, त्याचा पाठपुरावा करून संघटना पातळीवरून त्याला मान्य/मंजूर करून घेण्याची निस्वार्थ इच्छा पाहिली की ते पटते. थोडाही सामायिक मुद्दा असेल तर हे अधिकारी/पदाधिकारी त्यासाठी चर्चा करतात, संबंधित मान्यवरांची भेट घेतात. थोडक्यात सर्व प्रकारे प्रयत्न करतात आणि यशस्वी होतात.

आपल्या संघटनेपुढे अडचणीचा विचार करणे पण क्रमप्राप्त आहे. आपली सर्वात मोठी अडचण म्हणजे आपल्याकडे विषय खूप जास्त; त्यामुळे मागण्या जास्त! आणि राज्यशास्त्रिय दृष्टया हुशार लोकांना संघटीत करणे अतिशय कठिण असते, आणि हिच आपल्या संघटनेच्या दृष्टिकोनातून मोठी अडचण आहे. कारण मग संघटीत होण्याचा प्रश्न, नेतृत्वाचा प्रश्न,असे अनेक प्रश्न निर्माण होतात. सर्वच VIP असलेल्या आपल्या क्षेत्रात कोणी कोणासाठी काय मागायचे, कोणी कोणाचे नेतृत्व करावयाचे आणि ते कोणी मान्य करावयाचे हे प्रश्न असतात. परंतु वस्तुस्थि तीत संघटनेची आवश्यकता जेवढी आपणास आहे तेवढी कदाचितच इतर विभागास असेल कारण आपणास अथकपणे शिस्तबध्द व संघटीत रित्या काही मागण्याची सवय नाही (आपले मागच्या वेतन आयोगासमोर पाठपुरावा सोडा साधे representation सुध्दा नव्हते! यापेक्षा वेगळे काय सांगायचे) तरी आपणास काही ना मिळायचे याचे कारण आपली असलेली larger than life अशी प्रतिमा व काही अधिका–यांचे सर्व पातळीवरील वैयक्तिक संबंध असावेत असे मला

वाटते. पण तो भूतकाळ होता, म्हणून आपणास काही मिळाले. आजच्या बदलत्या परिस्थितीत अतिशय अभ्यासपुर्वक, इतर विभागाशी तुलना करून, इतर राज्याशी तुलना करून, कायद्याच्या चौकटीत बसवून काही मागीतले तरच ते मिळते आणि टिकते देखिल. आज ज्या पध्दतीने संघटनेचे पदाधिकारी काम करीत आहेत ते पाहिले तर हे पटते.

आता नमनाला घडाभर तेल ओतल्यानंतर, ज्यासाठी हे लिखाण करीत आहे त्या विषयाकडे वळतो. प्रस्तावणेत सांगितलेप्रमाणे संघटनेने आपल्या कौशल्यावर एक मोठे यश सवंर्ग निश्चिती करणाच्या स्वरूपात मिळवले आहे. (याविषयी सविस्तर भाष्य लेख मर्यादेमुळे येथे करता येणे शक्य नाही. ते संघटना पुढच्या अधिवेशनात सर्वानां समजेल अशा विस्तृतपणे सांगेल अशी आशा करूया) त्याबद्दल संघटनेने सर्वाचे आभार सुध्दा मांडलेले आहेत. पण हे सर्व ज्यांनी केले त्यांचे आभार न मानने ही कृतघ्नता ठरू शकते. यात प्रत्येकाने आपापल्या पध्दतीने काम केलेले असल्याने प्रत्येकांचा नामोल्लेख न करता या सर्वाचे या यशाबद्दल कौतुक/आभार मानावेत असे हे काम आहे. सवंर्ग निश्चितीचा विषय ज्या पध्दतीने या अधिका–यांनी हाताळला त्यातच त्याच्या यशाची बीजे रोवली गेली होती. अन्यथा मोठया प्रमाणावर ( अकारण व तत्वशुन्य ) विरोध असताना असा निर्णय होणे शक्यच नसते. कायदेशीर तरतूदी, वस्तुस्थिती इतर राज्यातील तुलनात्मक स्थिती, राज्यशासनावर पडणारा शून्य आर्थिक भार, राज्याच्या विकासासाठी आवश्यकता इ. बाबीचे अभ्यासपुर्वक presentation अनेक अधिका–यांसमोर, सचिवांसमोर, मा.मंत्री महोदयासमोर, अथकपणे वारंवार केल्याने शासनाच्या या प्रस्तावाचे महत्व व आवश्यकता सर्वानां पटली व त्यामुळेच मान्यता मिळू शकली.

या विषयाचा पाठपुरावा करीत असताना मला काही वेळा या प्रक्रीयांना जवळून पहाता आले आणि त्यामुळे मला हे लोक घेत असलेले श्रम ,चिकाटी ,अभ्यास, क्षमता जवळून अभ्यासता आली. आणि एखादी गोष्ट पदरात पाडून घेणे प्रत्यक्षात किती कठीण असते हे पण लक्षात आले व त्यामुळेच हे चार शब्द लिहिण्याची स्फुर्ती मिळाली.

बदलत्या काळाच्या पार्श्वभूमीवर जुन्या पध्दतीने आंदोलने, मागण्या करून काही मिळण्याची शक्यता आता राहिलेली नाही. कारण प्रत्येक जण कायदेशीर तरतूद, इतर तुलनात्मक परिस्थिती या आधारावर टिकण्यासारखे असेल केवळ त्याच प्रस्तावास अनुकूल असतात. असा अभ्यास स्वत: करून तो इतरांना पटवून देण्यासाठी ज्या क्षमता आवश्यक आहेत, जो अभ्यास आवश्यक आहे तो यांच्याकडे आहे. मान्यवरांसमोर तो present करण्यासाठी वेळ घेणे त्यासाठी, अथकपणे पाठपुरावा करणे यासाठी जो संयम हवा असतो तो यांच्याकडे आहे. असेच इतर अनेक आवश्यक गुण यांच्याकडे असल्यामुळे कदाचित हे यश मिळू शकले. अतिशय थोडक्यात सांगायचे तर यांची कपाटे संघटनेसाठी केलेल्या विविध पत्रव्यवहारांनी भरलेली आहेत, ज्यांची ना आपल्याला माहिती आहे ना जाण!

अर्थात या एकाच बाबीने किंवा यशाने आपले समाधान होणार नाही. आणि सुदृढ संघटनेसाठी तसे होऊ पण नये. आपल्या अनेक मागण्या आहेत त्या व्यवस्थितपणे आपण मागत राहूत, व या माध्यमातून पदरात पाडून घेऊतच. पण सध्या ज्या निस्वार्थपणे, समर्थपणे, अथकपणे ही टिम काम करीत आहे त्यांचे कौतुक (वरिष्ठ असेल तरी) आणि आभार (आपलेच असले तरी) व्यक्त न करणे म्हणजे नकारात्मक प्रेरणा होईल तसे होऊ नये यासाठी ती औपचारिकता सुध्दा पुर्ण

करने आवश्यक आहे. आणि म्हणून मी या सर्वाचे मन:पुर्वक आभार मानतो ............

**Thanks to you All  Core Team Revenue**

या मनोगताच्या निमित्ताने स्पष्ट करतो की, यातील सर्व मते व्यक्तीश: माझी आहेत. ती माझ्या अल्प ज्ञानावर व अल्प अनुभवावर आधारलेली असल्याने सदोष नसतीलच असे नाही. ती अनेकांना आवडणारही नाहीत. आणि त्यामुळेच विस्तारित प्रस्तावनेने सुरूवात करूनच मी हे मनोगत व्यक्त केले आहे. त्यामुळे ज्या सदोष बाबी यात आलेल्या असतील तर त्याविषयी मी मुक्तपणे दिलगीरी व्यक्त करतो (एवढे दिवस विवाहित असलेला व महसूलमध्ये असलेला माणूस कधीही विनाअट दिलगीरी व्यक्त करू शकतो ..... )  परंतु विनंती एवढीच की, ‘‘ भावनाओंको समजा करो! ‘‘